# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

**दुपार**

---

**दिनांक २५.०७.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची एनडीपीएस व मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २४.०७.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १० केसेसमध्ये ११ ईसमांवर कारवाई करून १,५२,१९०/—रू. चा मुद्‌देमाल जप्त केला आहे. जुगार कायदा अन्वये ०२ केसेसमध्ये ०२ इसमांवर कारवाई करुन १,५०५/— रु. चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,५६५ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,३६,४५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

दिनांक २४.०७.२०२६ चे २३.०० वा. ते दिनांक २५.०७.२०२६ चे ०५.०० वा. चे दरम्यान, केलेल्या रात्रगस्तीमध्ये कलम १३५ म.पो.का. कायद्यान्वये एकुण १० इसमांवर कारवाई करण्यात आलेली आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) गुन्हेशाखा युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :— हद्दपार ईसमास शस्त्रासह अटक.**

दिनांक २४.०७.२०२६ चे १८.३५ वा. चे सुमारास, गुन्हेशाखा युनिट क्र. ४ चे अधिकारी व अंमलदार हे पोलीस ठाणे बेलतरोडी हद्‌दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, संदीप वर्मा नावाचा हद्दपार इसम हा चिरंजीवीनगर येथील देवल ट्रेडर्स मागील मैदानात शस्त्रासह बसून आहे. अशा खात्रीशीर माहितीवरुन परिसरात शोध घेतला असता, तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारला असता, त्याने संदीप भारत वर्मा वय २६ वर्ष रा. महाकाली नगर, शितला माता मंदीरमागे, बेलतरोडी, नागपूर असे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता, त्याचे ताब्यात पॅन्टमध्ये खोसलेले एक लोखंडी शस्त्र कि. ५००/—रु. चा मुद्येमाल मिळून आल्याने, जप्त करण्यात आला. आरोपीचा अभिलेख तपासला असता, त्यास पोलीस उप आयुक्त परिमंडळ क्र. ०४ यांचे हद्‌दपार आदेश क्र. ०३/२०२५ दिनांक ०२.०६.२०२५ अन्वये नागपुर शहर व ग्रामीण हद्‌दीतुन ०२ वर्षाकरीता हद्‌दपार केल्याचे दिसुन आले. आरोपी हा हद्‌दपार असतांना कोणतीही परवानगी न घेता पोलीस ठाणे हद्‌दीत कोणतातरी गुन्हा करण्याचे उद्देशाने शस्त्रासह समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे बेलतरोडी येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का सहकलम १४२,१३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. आरोपीस पुढील कार्यवाहीस्तव बेलतरोडी पोलीसांचे ताब्यात देण्यात आले आहे. पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) नागपूर शहर, मा. श्री. दीपक अग्रवाल, पोलीस उप आयुक्त (डिटेक्शन), मा. श्री. वैभव जाधव, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हेशाखा), पोनि. बाबुराव राऊत यांचे मार्गदर्शनाखाली, पोउपनि. जितेशाचारी आरवेल्ली, पोहवा. निलेश ढोणे, पुरुषोत्तम जगनाडे, भगवतीकुमार ठाकूर, सुहास व चापोहवा. लक्ष्मण कळमकर यांनी केली.



**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे यशोधरानगर :— शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २४.०७.२०२६ चे २०.३० ते २१.१५ वा. चे दरम्यान, यशोधरानगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना माहिती मिळाली की, विटाभट्टी नाल्याजवळ पांढरा शर्ट व पॅन्ट घातलेला इसम हातात शस्त्र घेऊन धुमाकुळ घालत आहे. अशा माहितीवरुन घटनास्थळी जाऊन, तेथे पाहणी केली असता, प्राप्त वर्णनाचा इसम शस्त्रासह धुमाकुळ घालतांना दिसून आला. त्यास घेराव टाकून ताब्यात घेऊन, निशस्त्र केले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव रमजान बेग रशीद बेग वय २३ वर्षे रा. योगी अरविंद नगर, पांडे वस्ती, यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन लोखंडी चाकू किंमती २००/—रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने हातात चाकु घेवुन धुमाकुळ घालतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, सरतर्फे पोअं. भुषण येरोजवार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

**<u>२) पोलीस ठाणे एमआयडीसी :— चोरी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

फिर्यादी गिरीश अनिल बहेटे वय ४४ वर्ष रा. ग्रिनफिल्ड सोसायटी, फ्लॅट क. ४०१, बी विंग, ओल्ड सोसायटी, वाघदरा, हिंगणा रोड, एमआयडीसी, नागपूर हे व्यवसायाने बिल्डर/डेव्हलपर असून, त्यांचे पोलीस ठाणे एमआयडीसी हद्दीत, प्लॉट क्र. २९,३०,३१ व ३२, खसरा क्र. २९६/०२, तेजस्विनी विद्या मंदीरजवळ, रामनगर, हिंगणा रोड येथे गॅलेक्सी—५ या नावाने फ्लॅट स्किम बांधणे सुरु आहे. बांधकामाकरीता लागणारे नळ फिटींग व इलेक्ट्रीक फिटींगचे साहित्य त्यांनी नवनिर्माणाधीन इमारतीचे पहिल्या माळयावरील एका खोलीमध्ये ठेवले होते. नवनिर्माणाधीन इमारतीचे सुपरवायझर यांनी साहित्याची पाहणी केली असता, त्यांना वेगवेगळया एम. एम. चे कॉपर केबलचे ९३ बंडल, जग्वार कंपनीचे वेगवेगळे नळफिटींग साहित्य असा एकुण किंमती २,१९,३६३/—रू. चा मुद्देमाल दिसुन न आल्याने त्यांनी फिर्यादी यांना फोनद्वारे कळविले. फिर्यादी यांनी घटनास्थळी पाहणी केली असता, दिनांक २१.०७.२०२६ चे २०.०० वा. ते दिनांक २२.०७.२०२६ चे ०८.०० वा. चे दरम्यान, कोणीतरी अज्ञात चोरटयाने नमुद मुद्देमाल चोरून नेल्याचे दिसून आले.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे एमआयडीसी येथे पोउपनि. प्रशांत राऊत ७८८७८२१२२७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**पोलीस ठाणे नंदनवन :—** पोलीस ठाणे नंदनवन हद्दीत, प्लॉट क्र. ५९, मिरे ले—आऊट, गुरुदेव नगर येथे राहणारी महिला सौ. नंदिनी महेश मंगलकर वय ४५ वर्ष यांचे चार पाच दिवसांपुर्वी त्यांचे पतीसोबत भांडण झाल्याने, त्यांच्यात अबोला होता. यास कंटाळून दिनांक २३.०७.२६ रोजी सौ. नंदिनी यांनी त्यांचे राहते घरी बेडरुममध्ये सिलींग फॅनला ओढणीचे साहाय्याने गळफास घेतला. त्यांना उपचारकामी मेडीकल हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले.

यारप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे नंदनवन येथे पोउपनि. निलेश दळवी ७०२०३६१३९६ यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(मिसिंग)**

**१) पोलीस ठाणे सक्करदरा :—** कु. ज्योती प्रदीप कदम वय १८ वर्षे रा. ६५१, नेहरु नगर, झोन ऑफीसजवळ, सक्करदरा, नागपूर ही दिनांक १९.०७.२०२६ चे ०७.०० वा. पासुन पोलीस ठाणे सक्करदरा हद्दीतुन, राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेली. घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, बांधा—सडपातळ, उंची—४ फुट २ इंच, केस—काळे लांब, अंगात—काळ्या रंगाचा टॉप व कथिया रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— मराठी/हिंदी बोलते.

**२) पोलीस ठाणे कोराडी :—** वासुदेव सखाराम वाघमारे वय ७५ वर्षे, रा. समता नगर, आदी बोपचे यांचे घरी किरायाने, कोराडी, नागपूर हे दिनांक १३.०७.२०२६ चे १७.२० वा. पासून पोलीस ठाणे कोराडी हद्दीतील जनता चिकन शॉप, महादुला चौक येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा— सडपातळ, उंची— ५ फुट ६ इंच, केस—काळे पांढरे, अंगात— पांढरा शर्ट व कथिया रंगाचा पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**३) पोलीस ठाणे जरीपटका :—** गुरुदयालसिंग रामप्रसाद वय ७५ वर्षे, रा. कस्तुरबा नगर, गली क्र. ४, जरीपटका नागपूर हे दिनांक २०.०७.२०२६ चे १८.०० वा. पासून पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील राहते घरुन कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत उंची— ५ फुट ६ इंच, केस—काळे पांढरे, अंगात—शर्ट व पॅन्ट घातलेला आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात. हातात स्टिलचा कडा आहे.

**४) पोलीस ठाणे जरीपटका :—** अमिरश हॅरी मायकेल नागिस वय ४९ वर्षे, रा. प्लॉट क्र. एफ—५५, संत मार्टीननगर, चर्चजवळ, जरीपटका, नागपूर हे दिनांक २२.०७.२०२६ चे १६.०० वा. पासून पोलीस ठाणे जरीपटका हद्दीतील जनता चिकन शॉप, महादुला चौक येथून कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेले. घरी परत आले नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आले नाही. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—लांबट, बांधा—मजबुत, उंची— ५ फुट ३ इंच, केस—काळे पांढरे, अंगात— हाफ बरमुडा व गडद रंगाची गोल गळयाची बनियान घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.


कु. ज्योती


वासुदेव


गुरुदयालसिंग


अमिरश

**स्वा/—**

**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**